## <u>ठळक बातम्या</u>

- राज्याच्या अनेक भागात पावसानं जनजीवन विस्कळीत, २ दिवसात १३ जणांचा मृत्यू
- येत्या ३ दिवसात हवामानाची तीव्रता कायम राहण्याची शक्यता, शून्य बळींचं उद्दिष्ट ठेवून काम करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- वारीसाठी देहू-आळंदीत येण्याऐवजी पुण्यातच थांबण्याचं प्रशासनाचं वारकऱ्यांना आवाहन

**आणि**

- क्रोएशियात ग्रँड टूअर बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा आर. प्रज्ञानंद तिसऱ्या स्थानी

**<><><><><>**

मुंबईसह राज्यात ठिकठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली. आज दिवसभरात पुण्यात ३ जणांचा मृत्यू झाला. गेल्या २ दिवसात पावसामुळं विविध दुर्घटनांमध्ये १३ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाल्याची माहिती राज्याच्या आपत्ती निवारण कक्षानं दिली आहे. पालघर, रायगड, पुणे तसंच नाशिक घाटमाथा या भागांना उद्यासाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सातारा घाट परिसर, नाशिक या भागांना उद्यासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. सविस्तर वृत्तांत ऐकुया आमच्या प्रतिनिधी अंकिता आपटे यांच्याकडून…

**व्हीसी**

*(मुंबई महानगर क्षेत्रात गेले तीन दिवस पडणाऱ्या संततधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. वसई, विरार आणि नालासोपारा भागात पाणी साचल्यानं पश्चिम रेल्वेची वाहतूक सुमारे अर्धा तास उशिरा सुरू होती.*

*लोणावळ्यात रेल्वे मार्गावर दरडी कोसळल्यानं मुंबई-पुणे दरम्यान रेल्वे वाहतूक आज बंद होती. त्यामुळं अनेक गाड्या आज रद्द झाल्या असून लांबपल्ल्याच्या अनेक गाड्यांचे मार्ग आणि वेळा बदलण्यात आल्या आहेत. जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद असून या मार्गावरच्या एसटी गाड्यांची वाहतूक बंद आहे. मिसिंग लिंकच्या एका बोगद्यात पडलेला राडारोडा उचलण्यात आला असला तरी, सर्व सुरक्षाविषयक तपासण्या पूर्ण झाल्यानंतरच बोगदा पुन्हा सुरू होईल, असं प्रशासनाने कळवलं आहे.*

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

६ जुलै २०२६ - सोमवार

*पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यात पाटण इथे आज पहाटे दरड कोसळली. दुर्घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ पथकाने बचाव आणि मदतकार्य सुरू केलं. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून एकूण २३ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. तर आंबेठाण इथे दरड कोसळली असून एकूण ७५ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. खेड तालुक्यात एक जण पुराच्या पाण्यात वाहून गेला आहे. पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीच्या पाणीपातळीत वाढ होत असून भीमा नदीवरील दौंड पुलाजवळून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांतील नागरिकांना प्रशासनाने तातडीचा सतर्कतेचा इशारा दिला आहे.*

*हवामान खात्याने नाशिकमध्ये उद्या त्र्यंबकेश्वर जवळ ढगफुटीचा इशारा दिला आहे. यामुळे त्र्यंबकेश्वर, अंजनेरी भागात असलेल्या सर्व पर्यटनस्थळावर बंदी घालण्यात आली आहे. त्र्यंबकेश्वर, सप्तश्रुंगी मंदिर उद्या दिवसभर बंद ठेवण्यात येणार आहे. त्र्यंबकेश्वर, इगतपुरी भागातल्या सर्व शाळा, आठवडे बाजार बंद राहणार आहेत. नाशिकसह त्र्यंबक, पेठ, दिंडोरी, इगतपुरी तालुक्यातल्या सर्व शाळा उद्या बंद राहणार आहेत*

*रत्नागिरी जिल्ह्यात मुंबई- गोवा महामार्गावर कशेडीजवळ दरड कोसळल्यामुळे महामार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली होती. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अडथळे दूर केल्यानंतर एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. वरंध घाटात दरड कोसळ्यानं रस्ता बंद झाला आहे. मंडणगड तालुक्यात म्हाप्रळ आंबेत पुलाजवळ महाड तालुक्यातले बार्जेस भरकटून अडकल्या आहेत. पुलाला धोका असल्याने तात्पुरती मंडणगड - म्हाप्रळ गोरेगाव - माणगाव वाहतूक बंद केली आहे. भिसे खिंडीत दरड कोसळल्याने रोहा - नागोठणे रस्ता तर पालीत पाणी घुसल्याने वाकण - पाली - खोपोली रस्ता बंद करण्यात आला आहे.*

*रायगड जिल्ह्यात पेण -खोपोली मुख्य रस्त्यावर पाणी आल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. सुधागड तालुक्यात कानसळ इथे अंबा नदीजवळ अडकलेल्या १२ कामगारांना सुखरूप बाहेर काढलं आहे.*

*पालघर जिल्ह्यात संततधार पाऊस होत असून नद्या नाले दुथडी भरून वाहत आहेत. पाणी साचल्यानं रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. काही ठिकाणी सखल भागातल्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.*

*ठाणे जिल्ह्यातही जोरदार पाऊस होत असून सखल भागात पाणी साचल्यानं वाहतूक प्रभावित झाली आहे. आज झालेल्या दोन वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये एक रिक्षाचालक आणि अग्निशमन दलाचा एक जवान गंभीर जखमी झाले आहेत. दोन्ही जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.*

*कोल्हापूर जिल्ह्यात पंचगंगा नदीची पाणीपातळी ३४ फुटांवर पोहोचली आहे. राधानगरी धरणाचा पाणीसाठी ४५ टक्क्यांवर पोहोचला असून सध्या ५५ बंधारे पाण्याखाली आहेत. सांगली जिल्ह्यात कृष्णा आणि वारणा नदी पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस होत असून नद्यांची पाणी पातळीत वाढ होत आहे. बहे, सांगली, म्हैशाळ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. जालना शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरु आहे.*

**<><><><><>**

मुसळधार पावसामुळं आज मुंबईत विधीमंडळाचं कामकाज अवघ्या काही मिनिटात तहकूब करण्यात आलं. मुंबईत गेले ३-४ दिवस कोसळत असलेल्या पावसामुळे जीवितहानी आणि वित्तहानी झाल्याचा मुद्दा विरोधकांनी कामकाजाच्या सुरुवातीला उपस्थित केला आणि याप्रकरणी सविस्तर निवेदन देण्याची मागणी केली. याप्रकरणी उद्या निवेदन देणार असल्याचं सरकारच्या वतीनं स्पष्ट करण्यात आल्यानंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यभरात मुसळधार पावसाच्या शक्यतेसह येत्या तीन दिवसांत हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळं सर्व शासकीय यंत्रणा २४ तास अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. राज्य आपत्ती नियंत्रण कक्षात आयोजित बैठकीत ते बोलत होते. पुढील ४८ तास ‘शून्य बळी’ हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी. तसंच आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

खाजगी आस्थापनांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होमची सवलत द्यावी. असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. मुंबई-गोवा, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करावी. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

आषाढी वारीसाठी श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचं उद्या देहुतून तर श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं बुधवारी आळंदीतून प्रस्थान नियोजित आहेत. मात्र इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणे सुरक्षित नाही. ज्या वारकरी व भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, त्यांनी ज्या ठिकाणी आहात, त्या ठिकाणीच सुरक्षित थांबावे. देहू

व आळंदी येथे न जाता पुणे शहरात वारीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केलं आहे.

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकट काळात अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. दरम्यान, ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना ८ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या आपत्तीप्रकरणी काँग्रेसनं राज्य सरकारवर टीका केली आहे. मिसिंग लिंक प्रकल्पाच्या सुरक्षिततेबाबत १३ गंभीर आक्षेप पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात तज्ञांनी नोंदवले होते. त्यावर काम न करता घाईघाईत हा प्रकल्प रेटण्यात आल्याचा दावा कांग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

**<><><><><>**

तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इंडोनेशियात जकार्ता इथं पोहोचले. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रोबोवो सुबियांतो यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. मोदी यांच्या स्वागतार्थ इंडोनेशियातल्या स्थानिक आणि भारतीय वंशाच्या समुदायानं पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता.

**<><><><><>**

अयोध्येतल्या राम जन्मभूमी ट्रस्टने सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांचे राजीनामे स्वीकारले आहेत. ट्रस्टचे खजिनदार गोविंद गिरी यांनी ही माहिती दिली.

**<><><><><>**

क्रोएशियात झाग्रेब इथं ग्रँड टूअर बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या आर.  प्रज्ञानंदने साडे एकवीस गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला.  साडेतेवीस गुण मिळवणारा फ्रान्सचा फिरोझा अलिरेझा पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरला. भारताचा डी गुकेश सहाव्या क्रमांकावर राहिला.

**//<><><><><>//**